# सायबर गुन्ह्यांबाबत जागृतीसाठी स्पर्धा

## भरत नाट्य मंदिरात २१ डिसेंबरपासून आयोजन

**पुणे, ता. २९ :** सायबर सुरक्षिततेबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने शहर पोलिस आणि क्विक हिल फाउंडेशनच्या वतीने 'साय-फाय करंडक-२०१७' ही स्पर्धा आयोजित केली आहे. त्याच्या बोधचिन्हाचे नुकतेच अनावरण करण्यात आले. २१ ते २५ डिसेंबरदरम्यान भरत नाट्य मंदिरात ही स्पर्धा होईल.

क्विक हिल टेक्नॉलॉजिज कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक कैलास काटकर, आर्थिक व सायबर गुन्हे शाखेचे सहायक पोलिस आयुक्त मिलिंद पाटील, वरिष्ठ निरीक्षक राधिका फडके आणि एक्स्प्रेशन लॅबचे संचालक प्रदीप वैद्य उपस्थित होते.

सायबर गुन्ह्यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. गतवर्षी शहरात दोन हजार ९७ सायबर गुन्हे नोंदवले; तर चालू वर्षात हा आकडा चार हजारांवर पोचला आहे. त्यामुळे नेटिझन्सना जागरूक करण्याची आवश्यकता वाढली आहे.

काटकर म्हणाले, ''सायबर सुरक्षा या विषयावर नाट्यकलेच्या माध्यमातून जनजागृती करण्यात येणार आहे. त्यासाठी क्विक हिल फाउंडेशनतर्फे पुणे, मुंबई, औरंगाबाद, कोल्हापूर, गोवा आणि नागपूर शहरात सहा केंद्रांच्या माध्यमातून 'साय-फाय करंडक -२०१७'साठी ओर्ज स्वीकारण्यात आले. त्यात शंभरहून अधिक संघांनी सहभाग घेतला होता. त्यापैकी २८ संघांची निवड करण्यात आली आहे. सोबतच ऑनलाइन करंडक स्पर्धेचेही आयोजन केले आहे. महाराष्ट्रासह अन्य राज्यांतील कलावंतांनाही ऑनलाइन नाटक सादर करता येणार आहे. त्याची लिंक info@cyfiarts.com या ई-मेल आयडीवर पाठवता येईल. जास्त लाइक्स मिळणाऱ्या स्पर्धकाला विजेता घोषित करण्यात येईल.''


